**“मार्च २०२१” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- दिनांक १ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ४ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (सीपीटीपी-२) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपजिल्हाधिकारी, गट-अ मधील ५ अधिकाऱ्यांचा दिनांक ३० एप्रिल २०१७ पासून परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ५ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये लोक आयुक्त व उपलोक आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील १७ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ८ मार्च २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय उपाहारगृहातील उधार पतविक्रीपोटी विविध शासकीय विभाग / कार्यालयाकडून येणे असलेल्या उधार पतविक्रीची सवलत एक महिना करण्यात आली आहे.
- दिनांक ९ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६—सहायक अनुदाने (वेतन) या बाबीखाली रु.८,५१,२८०/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण, अमरावती या संस्थेस सन २०२०-२१ करिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखाली रु.४,४५,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेस सन २०२०-२१ करिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखाली रु.४,४५,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस सन २०२०-२१ करिता ३१—सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखाली रु.७९.२० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १५ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय अधिकारी आणि अधिकारी यांना द्यावयाच्या प्रशिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक १५ मार्च २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ८ तहसिलदार, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १५ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या आस्थापनेवरील ८ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १७ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग-दुसरा मध्ये विधानभवन उपाहारगृह व चौरस आहारगृहासाठी विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत संक्षिप्त देयकावर खर्च करण्यास प्रशासकीय विभागास वित्तीय प्राधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
- दिनांक २३ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखाली रु.२,३१,०००/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक २६ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखाली रु.७,१४,०००/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे यांना सन २०२०-२१ मध्ये झालेल्या रु.८५.२१ लाख इतक्या प्रशासकीय प्रशिक्षण खर्चासाठी निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**(ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- एका कक्ष अधिकाऱ्याला कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**<u>(ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-३ अशा ४ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**<u>(घ) ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ३ मार्च २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरी प्रशासकीय बाजूच्या गट-ब (अराजपत्रित) (मुख्य लिपिक) व गट-क (वरिष्ठ लिपिक / उपलेखापाल / वरिष्ठ भांडारपाल / रोखपाल / देयक लेखापाल / लेखा लिपकि / भांडारपाल / लिपिक / लिपिक-टंकलेखक) संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक १ जानेवारी २०१९ ते १ जानेवारी २०२१ या कालावधीतील तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३ मार्च २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील गट-ड (सहायक आचारी / चहा बनविणारा / पर्यवेक्षक / वाटपी / सफाईगागर / वेटर / बॉयवेटर / शिपाई / हमाल या संवर्गात नियमित नियुक्त ) (कुपन विक्रेता / आचारी / चहातज्ञ या संवर्गात तात्पुरती नियुक्त) संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१८ ते १ जानेवारी २०२१ या कालावधीतील तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ८ मार्च २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१९ ते १ जानेवारी २०२१ या कालावधीतील तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१८ ते १ जानेवारी २०२१ या कालावधीतील अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****